**शासकीय/महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांना पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यापूर्वी शासनाने विहित केलेल्या कालावधीची सेवा पूर्ण करणे अनिवार्य असल्याबाबतची अट लागू करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन निर्णय क्रमांक : एमईडी-१००६/सीआर-५/०६/शिक्षण-२,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : ३१ जुलै, २००६.

**वाचा** :- १) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. एनओसी- ३०९५/ सीआर-३०७/९५/शिक्षण-१, दि.२८ फेब्रुवारी, १९९६.

२) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. पीजीएम- १३९७/ सीआर-८/पार्ट-३/१५०/शिक्षण-१, दि. १९ जानेवारी, १९९८.

३) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. पीजीएम- १३९७/ सीआर-८/पार्ट-३/१५०/शिक्षण-१, दि. ६ फेब्रुवारी, १९९८.

४) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. पीजीएम- १३०१/ ४०६५/सीआर/४१८/२००१/शिक्षण-१, दि. २०.११. २००१.

५) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. पीजीएम- १००४/ सीआर-६३३/०४/शिक्षण-२, दि.११ मार्च, २००५.

**प्रस्तावना:-** शासकीय अथवा महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रम किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर शासनाकडून / महानगरपालिकेकडून मोठया प्रमाणावर खर्च केला जातो. या खर्चाच्या तुलनेत विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येत असलेले शैक्षणिक शुल्क अत्यल्प आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर शासन / महानगरपालिका करीत असलेला खर्च हा जनतेकडून आकारण्यात येत असलेल्या कराच्या उत्पन्नातून भागविला जात असल्याने जनतेच्या ऋणांची कांहीअंशी परतफेड व्हावी, या उद्देशाने पदवी अभ्यासक्रमाच्या / पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून शासकीय सेवा करण्याबाबतचे बंधपत्र लिहून घेण्यात येते. सदर

बंधपत्रानुसार पदवी प्राप्त केल्यानंतर उमेदवाराने शासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था/ संरक्षण दलाची दोन वर्षाची सेवा पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच पदव्युत्तर पदवी / पदविका प्राप्त केल्यानंतर उमेदवाराने शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था/संरक्षण दलाची तीन वर्षाची सेवा पूर्ण करणे आवश्यक आहे.

२. वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यापूर्वी उमेदवाराने बंधपत्रानुसार आवश्यक असलेल्या दोन वर्षाच्या सेवेपैकी किमान एक वर्षाची सेवा पूर्ण केलेली असणे अनिवार्य आहे, अशी अट शासनाने शासन निर्णय, दिनांक २८.२.१९९६ अन्वये लागू केली होती. ही अट शासन निर्णय दिनांक २०.११.२००१ नुसार सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षापुरती त्यानिर्णयात नमूद केलेल्या कारणास्तव शिथिल करण्यात आली होती व पुढे शासन निर्णय दिनांक ११.३.२००५ नुसार रद्द करण्यात आली आहे.

**शासन निर्णय :-** १. शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थांची रुग्णालये/प्राथमिक आरोग्य केंद्रे /ग्रामीण रुग्णालये इ. मधील रिक्त पदांचा आढावा घेतल्यानंतर शासनाच्या असे निदर्शनास आले की तेथील वैद्यकीय अधिकारी यांची पदे बऱ्याच प्रमाणात रिक्त आहेत. यास्तव शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

१) एम.बी.बी.एस. पदवी प्राप्त केलेल्या उमेदवारांपैकी खालील प्रकारात मोडणाऱ्या उमेदवारांना बंधपत्रातील अटीनुसार दोन वर्षाच्या शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सेवेपैकी, शासन प्रत्येक वर्षी विहित करेल अशा दिनांकास विहित कालावधीची सेवा पूर्ण केली असली पाहिजे, अन्यथा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठीच्या सामाईक प्रवेश परीक्षेस त्यांस बसता येणार नाही. म्हणजेच विहित केलेल्या दिनांकास जर त्यांची विहीत कालावधीची शासकीय सेवा पूर्ण झाली असेल तरच ते सामाईक प्रवेश परीक्षेस बसण्यास पात्र असतील.

(अ) शासकीय / महानगर पालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस. अभ्यासक्रम पूर्ण केलेले बंधपत्रित उमेदवार,

(ब) नोव्हेंबर/डिसेंबर २००४ मध्ये घेतलेल्या परिक्षेत किंवा त्यानंतरच्या परीक्षेत उत्तीर्ण

झालेल्या  वरील (अ) येथील उमेदवारांना, ही अट लागू राहील.

२) वरील अट शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून पुढील प्रत्येक वर्षी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षेसाठी लागू राहील. हा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर सन २००६-२००७ मध्ये या नेमणूका ऑगस्ट २००६  ते डिसेंबर/जानेवारी २००७ या कालावधीसाठी देण्यात येतील.

३) जे उमेदवार बंधपत्राची रक्कम शासनास अदा करतील अशा उमेदवारांना वरील (१ ) मधील अट लागू रहाणार नाही.

२. त्याचप्रमाणे एम.बी.बी.एस.पदवी प्राप्त केलेल्या उमेदवारांना बंधपत्रानुसार शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेतील सेवा बजावणे शक्य व्हावे याकरिता नियुक्ती देण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती शासन विहित करीत आहे.

१) एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाची परीक्षा वर्षातून दोनदा घेतली जाते. ( जुलै  व नोव्हेंबर मध्ये ) या परीक्षांचे निकाल सर्वसाधारणपणे ऑगस्ट व डिसेंबर महिन्यामध्ये जाहिर होतात. उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांनी एक वर्षाचे आंतरवासिता प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना एम.बी.बी.एस.उत्तीर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र विद्यापीठाकडून दिले जाते. त्यामुळे प्रत्येक वर्षी ऑगस्ट व डिसेंबरमध्ये रिक्त पदांवर नियुक्ती देण्यासाठी एम.बी.बी.एस.उत्तीर्ण उमेदवार उपलब्ध होतात. हे पहाता संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी ऑगस्ट व डिसेंबर महिन्यात आंतरवासिता पुर्ण केलेल्या उमेदवारांची सविस्तर माहिती संचालक, आरोग्य सेवा यांच्याकडे पाठवावी.

२) अशी माहिती  प्राप्त होताच संचालक, आरोग्य सेवा यांनी रिक्त पदाच्या माहितीसह जाहीरात देऊन सर्व उमेदवारांकडून मंडळनिहाय  तीन विकल्प मागवावेत.

३) गुणानुक्रमाने उमेदवारांना रिक्त असलेल्या पदासाठी पदस्थापना देण्यासाठी रिक्त जागेच्या प्रमाणात उपसंचालकांकडे वर्ग करण्यांत येईल.

४) ज्यांनी विकल्प दिला नाही, किंवा विकल्पानुसार नियुक्ती देणे शक्य न झाल्यास, त्यांना

त्यांच्या निवासी मंडळात अथवा जवळच्या मंडळात अथवा ज्या मंडळात पदे रिक्त असतील तेथे वर्ग करण्यांत येईल.

५) उपसंचालक त्यांच्याकडे रिक्त असलेल्या पदावर उमेदवारांच्या गुणानुक्रमाने रिक्त जागेवर पदस्थापना देतील.

६) रिक्त पदांपेक्षा जास्त असलेल्या उमेदवारांना मानधन तत्वावर वरील परिच्छेद क्र. २ (३), (४) व (५) प्रमाणे नियुक्ती देण्यात येईल व त्यांच्या सेवा गरजेनुसार वापरण्यात येतील. अशा उमेदवारांना काही कारणामुळे मानधन तत्वावरही नियुक्ती देणे शक्य न झाल्यास, त्यांना वरील परिच्छेद १ (१) मधील अटींमधून सुट  देण्यात येईल.

७) नियुक्त्या दिल्यानंतर आरोग्य संस्थांतील पदे रिक्त झाल्यास त्याच मंडळातील मानधन तत्वावरील उमेदवारास नियमित नेमणूक  उमेदवाराच्या इच्छेनुसार देण्यांत येईल.

८) जे उमेदवार १५ दिवसांत नियुक्तीनुसार रुजू होणार नाहीत, अशा उमेदवारांची नावे संचालक, आरोगय सेवा , मुंबई यांनी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना कळवावीत, जेणेकरुन ते बंधपत्राची रक्कम संबधित उमेदवारांकडून वसूल करण्याची कार्यवाही सुरु करु शकतील.

९) ज्या उमेदवारांनी शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेतील सेवा बजावली, अशा उमेदवारांची नांवे संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना कळवावीत. अशा उमेदवारांच्या बाबतीत त्यांनी  बंधपत्रानुसार शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेतील सेवा बजावली असल्याबाबतचे प्रमाणपत्र संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी अथवा ते ज्या अधिकाऱ्यास याबद्दल प्राधिकृत करतील अशा अधिकाऱ्याने द्यावे.

१०) जे उमेदवार बंधपत्राचे उल्लंघन करतील, त्या उमेदवारांकडून बंधपत्राची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांनी तातडीने करावी.

३. सदर निर्णय हा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नावांने,

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या (www.Mhaharashtra.gov.in) वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक २००७०७१११५४८२७००१ असा आहे.

सही/-
( वि.ला.ढोले )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, मुंबई.
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई.
सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क मंत्रालय,मुंबई. (यास प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह )
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई. ( ५ प्रती )
कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. ( पत्राने )
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली ( पत्राने )
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई ( ५ प्रती )
सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये / महानगरपालिकेची वैद्यकीय महाविद्यालये.
मा.मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव.
मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव.
मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य ), यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य ), यांचे खाजगी सचिव
सर्व विधान सभा / विधान परिषद सदस्य.
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय, मुंबई.
सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (शिक्षण-२)